प्रेसनोट

दि. १२/१०/२०२४

अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील रावेत पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार याना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे. गु.र.नं. ४१५/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५७ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | ज्ञानेदव तुकाराम बगाडे, वय ४४ वर्ष, पद- पोलीस हवालदार, नेमणुक - रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ११/१०/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. ११/१०/२०२४ |
| ठिकाण | गंधर्व हॉटेल समोर, पुनवळे, पिंपरी चिंचवड, पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व्यापारी असून, तक्रारदार यांच्या मुलाचा आणि एक मोटार सायकलस्वार यांचा पुनवळे येथे अपघात झाला होता. त्याबाबत एम.एल.सी. होवून लोकसेवक पो.हवा. ज्ञानदेव बगाडे यानी सदर अपघात प्रकरणी जबाब नोंदवून आपसात मिटवून देण्यासाठी व तक्रारदार यांच्या मुलावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी लोकसेवक ज्ञानदेव बगाडे यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक ज्ञानदेव बगाडे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी ५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, ५,०००/- (पाच हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता लोकसेवक ज्ञानदेव बगाडे याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विजय पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

१२/१०

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner